दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | शनिवार दि.३० मे २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २६४ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Saturday 30 May 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 264 | Pages 4 | Rate 4 Rs

### मराठा आरक्षणावर समाधानकारक काम

**मुंबई–**राज्याचे जलसंपदा मंत्री तथा मराठा उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज मराठा आरक्षणाच्या मुद्यावर समाधानकारक काम झाल्याचा दावा केला. मराठा आरक्षणाच्या बाबतीत मिसिंग लिंक शोधण्याच्या बाबतीत अनेक ठिकाणी समाधानकारक काम केले आहे. पण या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्येक तालुक्याला जाऊन सॅम्पल केसेसचा आढावा घेतला पाहिजे. वस्तुस्थिती काय आहे? हे समजून घेतले पाहिजे. ग्राऊंड रिपोर्ट काय सांगतो व आपल्याला येणारा अहवाल काय सांगतो हे पाहिले पाहिजे, असे ते म्हणालेत.छत्रपती संभाजीनगर येथे आज मराठा समन्वय समितीची बैठक झाली. या बैठकीला मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह भाजप आमदार प्रसाद लाड उपस्थित होते. या बैठकीनंतर बोलताना विखे पाटील म्हणाले, आज आम्ही मराठा आरक्षणाचा विस्ताराने आढावा घेतला. या प्रकरणी मुख्य प्रश्न जात प्रमाणपत्र देण्याचा आहे. या प्रकरणी आतापर्यंत काही कारवाई झाली.

# एआय क्रांतीत महाराष्ट्र नंबर १

# दहा हजार कोटींची गुंतवणूक

## राज्यामध्ये ६ 'सेंटर ऑफ एक्सलन्स' स्थापन करणार; स्टार्टअप्सना चालना

### प्रशासनात एआयचा धमाका

राज्यातील शासकीय सेवा अधिक गतिमान आणि पारदर्शक करण्यासाठी सरकारने 'एआय-फर्स्ट' धोरण स्वीकारले आहे. शेतकऱ्यांसाठी अत्यंत यशस्वी ठरलेल्या 'महा-विस्तार' पच्या धर्तीवर आता केंद्र सरकारच्या सहकार्याने 'इंडिया-विस्तार' ही राष्ट्रीय स्तरावरील संकल्पना राबवली जात आहे. गुन्हे तपासासाठी 'क्राईम ओएस' विकसित करणे आणि बांधकाम परवानग्यांच्या प्रक्रियेत एआयचा वापर अनिवार्य करणे, हे सरकारचे महत्त्वाचे निर्णय आहेत. यामुळे प्रशासनातील मानवी हस्तक्षेप कमी होऊन भ्रष्टाचाराला आळा बसणार आहे.



दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या जागतिक स्पर्धेत भारताचे नेतृत्व करण्यासाठी महाराष्ट्र सज्ज झाला असून, मुख्यमंत्र्यांनी राज्याचा महत्त्वाकांक्षी एआय व्हिजन' जाहीर केला आहे. मुंबई टेक वीक २०२६'च्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १० हजार कोटींच्या गुंतवणुकीतून देशाला 'एआय हब' बनवण्याचा संकल्प व्यक्त केला.या मिशन अंतर्गत राज्य सरकार १० हजार कोटींची मोठी गुंतवणूक करणार आहे. यातून राज्यात ६ 'सेंटर ऑफ एक्सलन्स' स्थापन करण्यात येतील आणि २००० जीपीयू (कंप्यूट-एज़-ए-सर्विस) उपलब्ध करून दिले जातील. या उपक्रमामुळे दीड लाख रोजगार निर्माण होतील आणि प्रशासकीय कामांसाठी ५० अत्याधुनिक एआय इंजिन्सची निर्मिती केली जाईल, अशी माहिती देण्यात आली आहे.

तंत्रज्ञानाच्या या शर्यतीत ''डीपफेक'' आणि डेटा सुरक्षेचे आव्हान पेलण्यासाठी ''एथिकल एआय'' हे राज्याच्या धोरणाचे मुख्य सूत्र असेल. एआयवर केवळ मोठ्या कंपन्यांची मक्तेदारी न राहता एमएसएमई उद्योगांनाही त्याचा समान लाभ मिळावा, याकडे मुख्यमंत्र्यांनी लक्ष वेधले. सरकार केवळ धोरणे आखते, खरी परिसंस्था स्टार्टअप्सच्या ऊर्जेतून उभी राहते, असे नमूद करत त्यांनी उद्योजकांना या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले. सलग तीन वर्षे देशात अव्वल ठरलेली महाराष्ट्राची स्टार्टअप परिसंस्था अधिक बळकट करण्यासाठी राज्य सरकार ''फंड ऑफ फंड्स''च्या माध्यमातून आर्थिक पाठबळ देणार आहे. या धोरणामुळे महाराष्ट्राच्या डिजिटल प्रगतीला नवी गती मिळणार आहे.

## पुणे, पिंपरी-चिंचवड विषारी दारू प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करण्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे आदेश

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

पुणे शहरातील हडपसर आणि पिंपरी-चिंचवडमधील दापोडी-फुगेवाडी परिसरात विषारी दारू प्यायल्याने १२ नागरिकांचा मृत्यू झाल्याची घटना अत्यंत दुर्दैवी असून, या प्रकरणातील दोषींची गय केली जाणार नाही, असे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी स्पष्ट केले आहे. या प्रकरणाच्या मुळाशी जाऊन सखोल चौकशी करण्याचे आदेश त्यांनी प्रशासनाला दिले आहेत.

**कडक कारवाईचे आदेश**

या घटनेची गंभीर दखल घेत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी पुणे व पिंपरी-चिंचवडचे



पोलीस आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी आणि स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधला.या दुर्घटनेच्या मुळाशी जाऊन तपास करा आणि अशा बेकायदेशीर कृत्यांमध्ये सहभागी असलेल्या सर्वांवर कठोर कारवाई करावी,अशा स्पष्ट सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.आतापर्यंत या प्रकरणात ८ जणांना अटक करण्यात आली आहे. पोलीस आणि उत्पादन शुल्क विभागाकडून संयुक्तपणे तपास सुरू असून, या विषारी दारूचा पुरवठा कोठून झाला आणि यात कोणाचा सहभाग आहे, याचा शोध घेतला जात आहे,अशी माहितीही उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिली.

## परळी वैजनाथ मंदिरा तील व्यवस्थेवर भाविकांचे प्रश्नचिन्ह

## सुरक्षा रक्षकांसह अन्नछत्र कर्मचाऱ्यांच्या वर्तनाबाबत नाराजी

दैनिक वादळ वार्ता

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

श्री वैजनाथ मंदिर येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसोबत मंदिर परिसरातील काही खासगी सुरक्षा रक्षक तसेच अन्नछत्रातील कर्मचाऱ्यांकडून उद्धट वर्तन होत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. संबंधित सुरक्षा कर्मचारी हे OOPL Security Force या खासगी सुरक्षा कंपनीशी संबंधित असल्याचे सांगितले जात आहे.भाविकांच्या म्हणण्यानुसार,दर्शन रांगेत उभ्या असलेल्या भाविकांशी काही महिला व पुरुष सुरक्षा कर्मचारी अरेरावीच्या भाषेत बोलतात.इतकेच नव्हे तर अन्नछत्रामध्येजेवणासाठी पास वाटप करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वर्तनही भाविकांना दुखावणारे असल्याचे आरोप होत आहेत.

एका भाविकाने सांगितले की,माझे लहान बाळ भुकेमुळे रडत आहे, कृपया लवकर पास द्या, अशी विनंती केलीअसता संबंधित




कर्मचाऱ्याने आमची बी लेकरं रडतात,काय करावे?असे उद्धट उत्तर दिले.या प्रकारामुळे भाविकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.तसेच मंदिरातील अन्नछत्रात जेवण वाढणाऱ्या काही महिला कर्मचारी,महिला सुरक्षा रक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांमध्येही वारंवार वाद होत असल्याचे भाविकांचे म्हणणे आहे.काही वेळा कर्मचाऱ्यांमध्येच भांडणे होत असल्याने मंदिरातील शिस्त आणि व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. देशाच्या विविध भागांतून भाविक मोठा खर्चकरून आणि श्रद्धेने श्री वैजनाथ मंदिर येथे दर्शनासाठी येतात.प्रत्येक भाविकाची देवाविषयी भावनावेगळी असते.मात्र मंदिरातच अपमानास्पद वागणूक मिळाल्याने भाविकांची भावना दुखावली जात असल्याचे दिसून येत आहे.याबाबत श्री वैजनाथ देवस्थान ट्रस्ट प्रशासनाने तातडीने लक्ष घालून संबंधित सुरक्षा कंपनी व कर्मचाऱ्यांना शिस्त,संयम आणि भाविकांशी आदराने वागण्याचे प्रशिक्षण द्यावे, अशी मागणी भाविकां कडून होत आहे.

# बारामतीच्या शिरपेचात मानाचा तुरा

## 'स्वच्छ-सुंदर बसस्थानक' अभियानात राज्यात प्रथम क्रमांक!

### उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडून बारामतीकर आणि एसटी कर्मचाऱ्यांचे कौतुक

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान २०२५' अंतर्गत बारामती बसस्थानकाने 'अ' वर्ग बसस्थानकांमध्ये संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावला आहे. बारामतीच्या या ऐतिहासिक आणि उल्लेखनीय कामगिरीबद्दल राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी सर्व बारामतीकर जनतेचे आणि एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून, हे यश प्रत्येक बारामतीकरासाठी अभिमानाचा आणि आनंदाचा क्षण आहे, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या आहेत.

**१ कोटींचे बक्षीस आणि स्मृतिचिन्ह**

या अभियानात अव्वल स्थान पटकावल्याबद्दल बारामती बसस्थानकाला रुपये १ कोटींचे बक्षीस आणि स्मृतिचिन्ह



प्रदान करण्यात येणार आहे.


**अजितदादांच्या विकासदृष्टीची पोचपावती**

या यशाबद्दल बोलताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या, स्वच्छता, शिस्त, नियोजन आणि उत्कृष्ट व्यवस्थापनाचा आदर्श उभा करणारे बारामती बसस्थानक म्हणजे आदरणीय अजितदादांच्या स्वप्नांचा आणि विकासदृष्टीचा जिवंत नमुना आहे. बारामती अधिक सुंदर आणि आदर्श व्हावी, यासाठी दादांनी पाहिलेले स्वप्न आज संपूर्ण राज्यासमोर आदर्श ठरले आहे. या यशामध्ये दादांची दूरदृष्टी, कामाप्रती असलेली निष्ठा आणि बारामतीबद्दलचे अपार प्रेम स्पष्टपणे दिसून येते. त्यामुळे हा सन्मान म्हणजे केवळ बसस्थानकाचा गौरव नसून, अजितदादांच्या कार्याला मिळालेली खरी पोचपावती आहे.

**कर्मचाऱ्यांच्या कष्टाचे फळ**

हे यश मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलणाऱ्या बारामती आगारातील चालक, वाहक, यांत्रिक, प्रशासकीय व पर्यवेक्षकीय कर्मचाऱ्यांच्या कष्टाचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी विशेष कौतुक केले. या सर्वांच्या सांघिक प्रयत्नांमुळेच बारामतीने संपूर्ण महाराष्ट्रात आपली एक वेगळी ओळख निर्माण केली असल्याचे त्यांनी नमूद केले. या आनंदाच्या आणि अभिमानाच्या क्षणी त्यांनी सर्व बारामतीकरांचे पुन्हा एकदा मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

## धानिवरी महामार्ग दुर्घटनेतील मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी ५ लाखांची मदत



दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई - अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ वरील धानिवरी गावाच्या हद्दीत झालेल्या भीषण अपघातात मृत्युमुखी पडलेल्या १३ व्यक्तींच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आली होती. त्यानुसार आज दिनांक २६ मे २०२६ रोजी १० मृत व्यक्तिंच्या वारसांना धनादेशाद्वारे मदत रक्कम वितरित करण्यात आली.

तहसीलदार सुनील कोळी यांच्या हस्ते संबंधित वारसांना धनादेश सुपूर्द करण्यात आले.

उर्वरित ३ मृत व्यक्तींच्या वारसांची आवश्यक कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर शासनामार्फत जाहीर करण्यात आलेली मदत रक्कम वितरित करण्यात येणार असल्याची माहिती प्रभारी जिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी दिली.या मदत वितरणाची कार्यवाही डहाणू तहसील कार्यालयामार्फत करण्यात आली असून प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.धानिवरी महामार्गावरील या भीषण दुर्घटनेनंतर प्रशासनाने तातडीने मदत व समन्वय प्रक्रिया राबवित मृतांच्या कुटुंबीयांना आर्थिक आधार देण्यासाठी कार्यवाही गतीने पूर्ण केली. मुख्यमंत्री सहायता निधीतून मिळालेल्या या आर्थिक मदतीमुळे संबंधित कुटुंबीयांना दिलासा मिळाला आहे.

# संपादकीय

## मुंबई महापालिका नव्या उत्पन्नाच्या शोधात

मुबईकरांना नागरी सुख-सुविधा पुरवणारी मुंबई महानगरपालिका आता उत्पन्नाच्या बाबतीत पिछाडीवर पडत चालली आहे. जकात कर बंद झाल्यापासून पालिकेचे हक्काचे आणि सर्वात मोठे उत्पन्नाचे साधन बंद झाले आहे. सध्या केवळ मालमत्ता कर आणि पाणीपट्टी या दोनच मुख्य स्रोतांवर पालिकेचा गाडा सुरू आहे आणि त्यातूनच पालिका मुंबईकरांच्या विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. आता याचाच एक भाग म्हणून पालिका आयुक्तांनी एक नवा आणि महत्त्वाकांक्षी प्रस्ताव तयार केला आहे. २०१७ पासून ओसाड पडलेल्या मुंबईच्या वेशीवरील जुन्या जकात नाक्यांच्या जागांचे रूपांतर अत्याधुनिक 'बस टर्मिनल' आणि 'पार्किंग हब'मध्ये करण्याची ही योजना आहे. मात्र, या योजनेतून पालिकेला अपेक्षित असलेले ध्येय खरोखरच साध्य होईल का? मुंबईकरांच्या थेट जिव्हाळ्याच्या असलेल्या याच विषयावर आणि प्रकल्पाच्या उद्देशावर प्रकाश टाकणारा हा विशेष प्रपंच.या योजनेअंतर्गत पालिका मानखुर्द जकात नाक्याच्या जागेवर आंतरराज्य बसेससाठी 'पार्किंग हब' साकारणार असून, त्यासाठी तब्बल १,५०० कोटी रुपयांचा खर्च केला जाणार आहे. येथे प्रवाशांसाठी थ्री-स्टार हॉटेल्स आणि अत्याधुनिक पार्किंग सुविधा असतील. याच धर्तीवर दहिसर जकात नाक्यावरही थ्री-स्टार हॉटेल, दुचाकी, चारचाकी, बसेस आणि ट्रक्ससाठी पार्किंग हब उभारण्याचे काम सुरू झाले आहे. मुंबईत सध्या इतर राज्यांतून येणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्स बसेसमुळे मुंबईकरांना प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. ही कोंडी फोडण्यासाठी इतर राज्यांतून व शहरांतून येणाऱ्या या बसेसना मुंबईच्या वेशीवर म्हणजेच दहिसर आणि मानखुर्द जकात नाक्यांवरच रोखण्यात येणार आहे. तिथून पुढे प्रवाशांना शहरात येण्यासाठी मेट्रो, बेस्ट बसेस आणि टॅक्सी यांसारख्या सार्वजनिक वाहतुकीचे पर्याय उपलब्ध करून दिले जातील. सध्या दहिसर जकात नाक्याची जागा १८,८६९ चौरस मीटर तर मानखुर्द जकात नाक्याची जागा २९,७७४ चौरस मीटर आहे. या दोन्ही मोक्याच्या जागा सध्या पालिकेच्या कोणत्याही उपयोगात येत नाहीत. त्यामुळे येथे पार्किंग हब उभारल्यास मुंबईतील वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होईल आणि पालिकेलाही मोठा महसूल मिळेल, असा पालिकेचा दावा आहे.मात्र, यात एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. पालिकेचा उद्देश कितीही चांगला असला, तरी हा प्रकल्प प्रत्यक्षात यशस्वी करण्यासाठी अनेक मोठे अडथळे पार करावे लागणार आहेत. मुळात, आजघडीला दररोज सुमारे एक ते दीड हजार खासगी ट्रॅव्हल्स बसेस मुंबईत प्रवेश करतात. संध्याकाळी बाहेर पडताना या बसेस दादर, सायन, चेंबूर, ठाणे, वांद्रे, अंधेरी आणि बोरिवली यांसारख्या प्रमुख नाक्यांवर उभ्या राहून प्रचंड वाहतूक कोंडी करतात. या व्यवसायात मोठे आर्थिक व्यवहार गुंतलेले असल्याने वाहतूक पोलिसांकडूनही या बसेसवर ठोस कारवाई केली जात नाही, हे उघड गुपित आहे. या ट्रॅव्हल्समुळे मुंबईत जागोजागी ट्रॅव्हल्स एजंट्सचे पेव फुटले असून, भाड्याने दुकाने घेऊन किंवा इतर उद्योगांचे परवाने वापरून हे व्यवसाय बिनधास्तपणे थाटले जात आहेत. या संपूर्ण व्यवसायात कोणतेही नियम उरलेले नसून सर्व काही अनियंत्रितपणे सुरू आहे. या बसेस दिवसभर मुंबईतील वेगवेगळ्या रस्त्यांवर बेकायदेशीरपणे पार्क केल्या जातात. यापूर्वी वडाळा येथील 'ट्रक टर्मिनल' हे आंतरराज्य बस टर्मिनलसाठी राखीव ठेवण्यात आले होते, मात्र खासगी वाहतूकदारांनी त्यात रस न घेतल्यामुळे त्या चांगल्या योजनेचा पार बऱ्या वाजला. त्यामुळे पालिकेच्या या नव्या योजनेला तरी हे खासगी ट्रॅव्हल्स चालक कितपत प्रतिसाद देतील, याबाबत मोठी शंका आहे.याचे मुख्य कारण म्हणजे, आज खासगी वाहतूकदारांची एक अत्यंत बलाढ्य 'लॉबी' निर्माण झाली आहे, जी आपल्या सोयीनुसार कायदे आणि नियम वाकवून घेते. काही वर्षांपूर्वी मुंबईतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी 'बाहेरून येणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्स बसेसना सकाळी ८ नंतर मुंबईत प्रवेश दिला जाणार नाही', असा नियम करण्यात आला होता. मात्र, या वाहतूकदारांच्या लॉबीने थेट सरकार दरबारी वजन वापरून या प्रस्तावाला कडाडून विरोध केला, नियम वाकवला आणि आपली वाहतूक पूर्ववत सुरू करून घेतली. खासगी बसेसच्या करांमध्ये किंवा टोलमध्ये थोडी जरी वाढ केली, तरी ही लॉबी लगेच सक्रिय होते आणि सरकारकडून आपल्या मागण्या मान्य करून घेते. वाहतूक विभागाने कोणताही कडक नियम लागू केला की, ही लॉबी थेट मुख्यमंत्र्यांपर्यंत किंवा वरिष्ठांपर्यंत पोहोचते आणि तो नियम एका-दोन दिवसांत रद्द करून घेण्याची ताकद या वाहतूकदारांकडे आहे. त्यामुळे पालिकेच्या या नव्या प्रस्तावित प्रकल्पाला कितपत ठोस यश मिळेल, याविषयी शंका घेण्यास वाव आहे.आता या प्रकल्पाकडे प्रवाशांच्या दृष्टिकोनातून पाहणेही गरजेचे आहे. जर या सर्व बसेस दहिसर किंवा मानखुर्द (वाशीजवळ) जकात नाक्यांवरच थांबवल्या, तर लांबचा प्रवास करून आलेल्या प्रवाशांना आपल्या कुटुंबासह आणि जड सामानसुमानांसह तिथे उतरावे लागेल. तिथून पुढे मुंबईतील आपल्या निश्चित स्थळी जाण्यासाठी दुसरा पर्याय शोधणे हा प्रवाशांसाठी एक मोठा 'द्रविडी प्राणायाम' ठरणार आहे. कारण, मुंबईतील सध्याची 'बेस्ट' सेवा किंवा मेट्रो-मोनोचे जाळे या प्रवाशांच्या ओझ्याला पूर्णपणे पूरक ठरू शकेल का, हा प्रश्नच आहे. राहता राहिला प्रश्न रिक्षा आणि टॅक्सीवाल्यांचा; अशा मोक्याच्या ठिकाणी रिक्षा-टॅक्सीचालक प्रवाशांची मोठी आर्थिक अडवणूक करण्याची दाट शक्यता आहे. सध्या दादर, वांद्रे टर्मिनस किंवा लोकमान्य टिळक टर्मिनस (कुर्ला)सारख्या दूरच्या स्थानकांवर उतरून मुंबईत आपल्या घरी जाणे प्रवाशांना किती आर्थिक भुर्दंडाचे ठरते, हे आपण रोज पाहत आहोत. प्रशासनाने कितीही कडक नियम केले, तरी अशा ठिकाणी प्रवाशांची आर्थिक पिळवणूक होतेच, हे वास्तव कोणीही नाकारू शकत नाही.

# दिल्लीतील महाराष्ट्र सदनातील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करा-मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची अधिकाऱ्यांना तंबी

## दिल्ली येथील अधिकारी व कर्मचारी निवास तसेच इतर प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिल्ली दौऱ्यादरम्यान नवीन व जुने महाराष्ट्र सदन येथील विविध प्रलंबित विकासकामांचा सविस्तर आढावा घेत संबंधित विभागातील अधिकारी व अभियंत्यांची बैठक घेतली. महाराष्ट्र सदनातील कामांमध्ये होत असलेली अनावश्यक दिरंगाई खपवून घेतली जाणार नसल्याचे स्पष्ट करत कामे दर्जेदार, नियोजनबद्ध आणि वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच कामांबाबत हलगर्जीपणा व निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांना त्यांनी स्पष्ट शब्दांत तंबी दिली.महाराष्ट्रातून दिल्ली येथे विविध शासकीय कामांसाठी, उपचारांसाठी तसेच इतर कारणांनी मोठ्या प्रमाणावर नागरिक येत असतात. अशा नागरिकांना महाराष्ट्र सदनात अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी शासन प्राधान्याने काम करत असल्याचे मंत्री भोसले यांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्र सदन हे राज्याचे प्रतिनिधित्व करणारे महत्त्वाचे केंद्र असल्याने येथील सुविधा, स्वच्छता, देखभाल आणि आधुनिक सोयीसुविधा उच्च दर्जाच्या असणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. त्याच बरोबर अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी मंजूर केलेले निवासाचे काम देखील जलद गतीने पूर्ण कणायसाठी सूचना दिल्या.

बैठकीदरम्यान नवीन महाराष्ट्र सदन व जुने महाराष्ट्र सदन येथे सुरू असलेल्या दुरुस्ती, सुशोभीकरण, कर्मचारी निवास व्यवस्था सुधारणा, विद्युत व्यवस्था, पायाभूत सुविधा उन्नतीकरण, अंतर्गत देखभाल तसेच विविध प्रलंबित कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. अनेक कामे मंजूर होऊनही अद्याप पूर्णत्वास न गेल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. संबंधित अधिकाऱ्यांनी नियमितपणे प्रत्यक्ष पाहणी करून कामांमध्ये गती आणावी तसेच कामांच्या गुणवत्तेत कोणतीही तडजोड होऊ नये, अशा स्पष्ट सूचना मंत्री भोसले यांनी दिल्या.

कामांच्या प्रगतीबाबत समाधानकारक स्थिती दिसून न आल्याने काही संबंधित अधिकाऱ्यांना मंत्री भोसले यांनी बैठकीतच कडक शब्दांत तंबी दिली. नागरिकांच्या सुविधांशी संबंधित कामांमध्ये विलंब होणे गंभीर बाब असून, यापुढे कामकाजात दिरंगाई आढळल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.यावेळी महाराष्ट्र सदनातील विविध विकासकामांच्या



प्रगतीचा आढावा घेण्यात आला. यापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या विविध कामांची सद्यस्थिती, कामांची गती आणि गुणवत्ता याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या कामांमध्ये कोणतीही दिरंगाई होऊ नये तसेच नागरिकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आवश्यक त्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.शासन निर्णयानुसार नवीन महाराष्ट्र सदनाच्या मागील बाजूचे नुतनीकरण, नवीन व जुन्या महाराष्ट्र सदनातील विद्युत उपकरणांचे अद्यावतीकरण तसेच आधुनिक आयपी आधारित सीसीटीव्ही यंत्रणा उभारणीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यामध्ये नुतनीकरण, विद्युतीकरण, फर्निचर, एचव्हीएसी दुरुस्ती, एलईडी प्रकाशयोजना सुधारणा, विद्युत वायरिंग बदल, तसेच नवीन सीसीटीव्ही यंत्रणा स्थापनेचा समावेश आहे.कामे हाती घेताना अर्थसंकल्पीय तरतूद, तांत्रिक मान्यता, पर्यावरण विषयक नियम, 'ना हरकत' प्रमाणपत्रे, ई-निविदा प्रक्रिया तसेच ऋशच् पोर्टलच्या कार्यपद्धतीचे पालन करण्याच्या सूचनाही शासनाने दिल्या आहेत. कामांमध्ये गुणवत्तेला प्राधान्य देत वेळेत पूर्ण करण्यावर भर देण्यात आला आहे.

कामांची गुणवत्ता, वेळेचे नियोजन आणि प्रशासनातील समन्वय याबाबत अधिक दक्षता घेण्याचे निर्देश देत मंत्री भोसले यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्यास सांगितले. कामांच्या प्रगतीचा नियमित आढावा घेण्यात येईल तसेच प्रलंबित कामांबाबत हलगर्जीपणा करणाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल, असेही त्यांनी नमूद केले.यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागातील वरिष्ठ अधिकारी, अभियंते तसेच महाराष्ट्र सदन प्रशासनातील संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# निर्जला एकादशी निमित्त जय माँ अमरज्योती महिला मंडळ कळंबोलीच्या वतीने मोफत सरबतचे वाटप

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

निर्मला एकादशीचे औचित्य साधून जय माँ अमरज्योती महिला मंडळ कळंबोलीने सामाजिक बांधिलकी जपली आहे. देशभरात सूर्याचा प्रकोप वाढत असून, उन्हाच्या झळांनी नागरिक हैराण झाले आहेत. अशा परिस्थितीत कळंबोली केएल चौकात प्रवाशांसाठी मोफत शरबत वाटपाचा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमामुळे तहानलेल्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला असून मंडळाच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. सध्या संपूर्ण राज्यात तापमानाचा पारा चढलेला आहे. कडक उन्हामुळे उष्माघात, चक्कर येणे आणि निर्जलीकरण (डिहाड्रेशन) यांसारख्या समस्या वाढल्या आहेत. दुपारी घराबाहेर पडणे कठीण झाले असून, प्रवासात पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवत आहे. कळंबोली येथील ' जय माँ अमरज्योती मंडळ कळंबोलीच्या मंडळाच्या अध्यक्षा सुशीला







शर्मा यांच्या प्रयत्नातून आज निर्जला एकादशी निमित्त एका विशेष सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कळंबोली के एल २ या वर्दळीच्या चौकात चारही रस्त्याने येणाऱ्या-जाणाऱ्या प्रत्येक नागरिकाला या मंडळाच्या महिला भगिनी मोफत शीतल शरबत देऊन त्यांचे स्वागत करत होत्या आले.या उपक्रमाला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. लोक गाड्या थांबवून किंवा रस्त्याने चालणारे नागरिक थांबून सरबताचा आनंद घेत होते. मोर्बे येथील एका आदिवासी महिलेने भावना व्यक्त करताना सांगितले की, तहान लागली होती. पाण्यासाठी जीव कासावीस झाला होता. पाणी शोधत असताना तेवढ्यात ही शरबत मिळाल्याने खूप समाधान वाटले. मन तृप्त झाले.तप्त उन्हात हा उपक्रम प्रवाशांसाठी विशेष ठरला. नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.पनवेल महानगर पालिकेचे कर्तव्यदक्ष नगरसेवक राजेंद्र ( राजू ) शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जय माँ अमरज्योती मंडळ कळंबोलीच्या अध्यक्षा सुशीला शर्मा यांच्या नेतृत्वाखाली सरबत वाटपाचा हा सामाजिक उपक्रम यशस्वी करण्यासाठी गीता स्वामी , राज शर्मा, , सुमित्रा , संतोष सरिता ,अनीता , सोनू ,माया , बबली , शीला , गुड्डी कृष्णा,कांता , इंद्रावती ,परमिंदर आंटी या महिला भगिनीनी उन्हात उभ्या राहून नागरिकांना ५० मीटरच्या अंतरातील नागरिकांना सरबतचे सेवा दिला. यामुळे यामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# दिव्यात नालेसफाईनंतर शाळेसह अनेक ठिकाणी कचऱ्याचा डोंगर;लोकप्रतिनिधिंचे देखील दुर्लक्ष

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

ठाणे महापालिका आयुक्त सौरव राव यांनी पावसाळा पूर्व नालेसफाई मोहीम मोठ्या गाजावाजात करत केली सुरू असली तरी प्रत्यक्षात दिवा परिसरात नालेसफाईनंतर काढण्यात आलेला गाळ आणि कचरा अनेक ठिकाणी रस्त्याच्या कडेलाच पडल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. विशेष म्हणजे काही शाळांसमोरच नाल्यातील दुर्गंधीयुक्त कचऱ्याचे ढिगारे पडून १५ दिवस झाले असून देखील पालिका प्रशासनाने न उचलल्याने विद्यार्थी, पालक आणि स्थानिक नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.




दिव्यातील विविध भागांमध्ये नाल्यांमधून काढलेला चिखल, प्लास्टिक, सडलेला कचरा आणि गाळ अनेक दिवसांपासून उचलण्यात आलेला नाही. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून डासांचे प्रमाणही वाढले आहे. शाळा प्रवेशासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना या घाणीमधून मार्ग काढत जावे लागत असल्याने पालकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, ठाणे महापालिकेकडून नालेसफाईचे काम फक्त दिखाव्यासाठी केले जात असून साफसफाईनंतर कचरा तत्काळ उचलला जात नाही. परिणामी पाऊस सुरू झाल्यानंतर हाच गाळ पुन्हा नाल्यात जाण्याची शक्यता असून पूरस्थिती निर्माण होऊ शकते, अशी भीतीही व्यक्त केली जात आहे. नागरिकांनी ठाणे महापालिकेच्या संबंधित विभागाने तात्काळ दखल घेऊन रस्त्यावर पडून असलेला गाळ व कचरा उचलावा तसेच शाळांसमोरील परिसर स्वच्छ करून आरोग्याचा प्रश्न गंभीर होण्यापूर्वी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

# मुंबई-गोवा महामार्गावर वृक्षारोपणाचा तळेकांटे गावाचा संकल्प

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणावर झाडांची लागवड करण्याचा संकल्प संगमेश्वर तालुक्यातील तळेकांटे ग्रामस्थांनी केला असून, वृक्षारोपण २०२६ या उपक्रमांतर्गत रविवारी दि. २८ जून २०२६ रोजी वृक्षारोपण मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे.तळेकांटे , हायवे, बावनदी परिसरातील ग्रामस्थांनी एकत्र येत पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घेतला आहे. वाढते तापमान, कमी होत चाललेली झाडांची संख्या आणि बदलते हवामान यामुळे भविष्यात निर्माण होणाऱ्या संकटाची जाणीव ठेवून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.ग्रामस्थांच्या मते, मुंबई-गोवा महामार्ग विस्तारीकरणानंतर अनेक झाडे तोडली गेली. त्यामुळे परिसरातील उष्णतेत वाढ झाली असून, पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला आहे. यावर उपाय म्हणून गावकऱ्यांनी झाडे लावण्याचा निर्धार केला आहे.

या मोहिमेत वड, पिंपळ, चिंच, उंबर यांसारख्या दीर्घायुषी आणि पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. पावसाळा सुरू झाल्यानंतर या झाडांची वाढ चांगली होईल आणि भविष्यात प्रवाशांना सावली तसेच परिसराला हिरवळ मिळेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.ग्रामस्थांनी ही झाडे आपण लावलेली होती असे अभिमानाने पुढील पिढीला सांगता यावे, यासाठी प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# चक्रीवादळाचा तडाखा; चिंचवडगाव येथे शेतकऱ्याच्या सौर ऊर्जा पंपाचे मोठे नुकसान, तातडीने मदतीची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**वडवणी । प्रतिनिधी**

राज्यात हवामानात सातत्याने बदल होत असून, काल दिनांक २७ मे २०२६ मध्यरात्री बीड जिल्ह्यातील वडवणी परिसरात अचानक आलेल्या जोरदार चक्रीवादळाने आणि वादळी वाऱ्याने मोठी पडझड घडवून आणली आहे. या नैसर्गिक आपत्तीचा मोठा फटका मौजे चिंचवडगाव येथील एका शेतकऱ्याला बसला असून, त्यांच्या शेतातील सौर ऊर्जा पंपाचे अतोनात नुकसान झाले आहे.

चिंचवडगाव ता. वडवणी येथील रहिवासी आणि प्रगतशील शेतकरी श्री. सुधाकर विनायक आंधळे यांच्या शेतामध्ये 'सीआरआय' (CRI) कंपनीचा सौर ऊर्जा पंप बसवण्यात आलेला होता. हा पंप त्यांच्या शेतीच्या सिंचनाचा मुख्य आधार होता. मात्र, काल दुपारच्या सुमारास परिसरात अचानक वादळी वाऱ्यासह भीषण चक्रीवादळ धडकले. या वादळाचा वेग इतका प्रचंड होता की, शेतातील सौर ऊर्जा पंपाचे पॅनेल्स आणि संपूर्ण यंत्रणा उखडून फेकली गेली, ज्यामुळे पंपाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

**शेतकऱ्यासमोर आर्थिक संकट**

या अचानक आलेल्या नैसर्गिक संकटामुळे शेतकरी सुधाकर आंधळे यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. सद्यस्थितीत शेतीची कामे अंतिम टप्प्यात असतानाच पाण्याचा मुख्य स्त्रोत असलेला सौर पंप निकामी झाल्यामुळे त्यांच्या शेतीकामांवर आणि पिकांच्या सिंचनावर याचा विपरीत परिणाम झाला आहे हा सौर पंप माझ्या शेतीचा मुख्य आधार होता. वादळामुळे याचे संपूर्ण नुकसान झाले असून आता पिकांना पाणी कसे द्यावे, असा प्रश्न माझ्यासमोर उभा राहिला आहे. कंपनीने आणि प्रशासनाने माझी अडचण समजून घेऊन त्वरित मदत करावी.
श्री. सुधाकर विनायक आंधळे (बाधित शेतकरी)

**'सीआरआय' कंपनी आणि प्रशासनाकडे मागणी**

या घटनेनंतर पीडित शेतकऱ्याने आणि ग्रामस्थांनी संबंधित कंपनी व प्रशासनाकडे तातडीने मदतीची मागणी केली आहे:

कंपनीकडे मागणी: 'सीआरआय' कंपनीच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करावा आणि नुकसानग्रस्त सौर ऊर्जा पंप लवकरात लवकर बदलून (Replace) द्यावा.

शासकीय प्रशासनाकडून अपेक्षा: स्थानिक महसूल व कृषी विभागानेही या आपत्तीची गांभीर्याने दखल घेऊन नुकसानीचा शासकीय अहवाल तयार करावा आणि संबंधित शेतकऱ्याला योग्य ती आर्थिक मदत व सहकार्य मिळवून द्यावे, अशी रास्त अपेक्षा चिंचवडगाव परिसरातील शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे.



# मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात वाघोली ग्रामपंचायतीवर अन्याय?

## संतप्त ग्रामस्थांचे गांधीगिरी आंदोलन; सामूहिक मुंडण करून प्रशासनाचा निषेध

दैनिक वादळ वार्ता

**शेवगाव । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान २०२५-२६ च्या तालुकास्तरीय निवड प्रक्रियेत पारदर्शकता न राखता आदर्श ग्रामपंचायत वाघोलीला डावलण्यात आल्याचा आरोप करत संतप्त ग्रामस्थांनी पंचायत समिती कार्यालयासमोर गांधीगिरी आंदोलन छेडले. यावेळी ग्रामस्थांनी प्रतिकात्मक स्वच्छता मोहीम, लेझीम सादरीकरण तसेच सामूहिक मुंडण आंदोलन करून प्रशासनाचा निषेध नोंदवला.

शुक्रवार दि. २९ मे रोजी वाघोली येथील ग्रामस्थांनी आखेगाव रस्त्यावरील स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या पुतळ्यापासून वाजत-गाजत मोर्चा काढत पंचायत समिती कार्यालय गाठले. या मोर्चामध्ये महिला, युवक, लहान मुले तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पुरस्कार नको पण न्याय द्या, ग्रामविकासाला न्याय मिळालाच पाहिजे अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

ग्रामस्थांनी पंचायत समिती कार्यालयासमोरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून परिसराची स्वच्छता केली. त्यानंतर पारंपरिक वाद्यांच्या गजरात लेझीम खेळून गावावर झालेल्या अन्यायाचा निषेध व्यक्त करण्यात आला.

यावेळी राजेंद्र जमधडे, बाबासाहेब गाडगे, भीमराव सागडे, कचरू चोथे, डॉ. निरज लांडे, शिवाजी भिसे, अनंता उकिर्डे, महादेव पाटेकर, गणेश म्हस्के, मयुरी ब्राम्हणे, संजय शिंदे आदी वक्त्यांनी भाषणातून प्रशासनावर तीव्र टीका केली. लोकसहभागातून रचनात्मक विकासकामे करून राज्यस्तरीय पुरस्कार मिळविणाऱ्या गावाला जाणीवपूर्वक डावलण्यात आले, असा आरोप त्यांनी केला.

दरम्यान, पंचायत समितीच्या प्रवेशद्वारात उमेश भालसिंग यांच्यासह युवकांनी सामूहिक मुंडण करून निषेध व्यक्त केला. यावेळी बोलताना उमेश भालसिंग म्हणाले की, गेल्या दहा वर्षांत ग्रामस्थांनी श्रमदान व लोकसहभागातून पर्यावरण संवर्धन, वृक्षलागवड, जलसंधारण, नदी खोलीकरण, बायोगॅस निर्मिती, विषमुक्त शेती, सोलर कृषी वाहिनी योजना, शिक्षण व आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय काम केले आहे. मात्र, अभियानाच्या परीक्षणासाठी आलेल्या समितीने राजकीय दबाव व आर्थिक हितसंबंध जपत गावाला तालुकास्तरावरच वगळले. त्यामुळे ग्रामस्थांचा हिरमोड झाला आहे.

ग्रामस्थांनी प्रशासनाकडे सर्व गावांचे गुणांकन जाहीर करण्याची तसेच पुन्हा निष्पक्ष परीक्षण करण्याची मागणी केली आहे. तोपर्यंत जिल्हा, विभाग व राज्यस्तरीय पुढील प्रक्रिया स्थगित ठेवावी, अन्यथा दि. ३१ मे रोजी चौंडी येथे मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला.

यावेळी सरपंच सुष्मिता भालसिंग, उपसरपंच कल्पना भालसिंग, हिराबाई शिंगटे, मोहन गवळी, संतोष आल्हाट, रावसाहेब शिंगटे, काकासाहेब आल्हाट, विष्णू घनवट, ज्ञानेश्वर उगले, सचिन लांडे, सुभाष बरबडे, बाळासाहेब देशपांडे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गटविकास अधिकारी सोनल शहा यांनी ग्रामस्थांचे निवेदन स्वीकारून संबंधित बाब जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सादर करण्यात येईल, असे आश्वासन दिले.मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत गावांनी केलेले स्वमूल्यांकन, प्रशासनाचे गुणांकन तसेच गावांची अंतिम निवड याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. तरीदेखील पुढील स्तरावरील मूल्यांकन प्रक्रिया सुरू असल्याने संशय निर्माण झाला आहे. गावांची निवड करताना कोणते निकष वापरण्यात आले, याबाबतही स्पष्टता नसल्याने अभियानात राजकीय हस्तक्षेप झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. या संपूर्ण प्रक्रियेचा सोक्षमोक्ष लागेपर्यंत पुढील प्रक्रिया थांबवावी, अन्यथा मोठ्या जनआंदोलनाचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.



## बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने पेट्रोल डिझेल दरवाढी विरोधात आंदोलन,इंधन टंचाई व दरवाढ तात्काळ कमी करा-राहुल सोनवणे




दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

राज्यामध्ये मागील काही दिवसांपासून पेट्रोल डिझेल गॅसचा तुटवडा मोठ्या प्रमाणात सुरू असुन आज बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे यांच्या नेतृत्वात बीड येथे आंदोलन करून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे म्हणाले की, सध्या शेतीच्या मशागती चे दिवस सुरू असून पेट्रोल डिझेल टंचाई व दरवाढ सुरू आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड मोठे नुकसान व मानसिक हानी सुरू आहे मात्र पंतप्रधान मोदी परदेशात जावून चॉकलेट वाटण्याचे लाजिरवाणे काम करत आहेत. मागील बारा वर्षापासून देशात आणि राज्यात भाजपची एक हाती सत्ता असताना देखील महागाईवर कुठलेही नियंत्रण यासरकरचे दिसत नाही.लोकहिता च्या कुठल्याही योजना न आणता मन की बात करत देशातील जनतेची फसवणुक करण्याचे काम नरेंद्र मोदी व भारतीय जनता पक्ष करत असुन वाढलेली महागाई हे या सरकारचे नाकरते पणाचे लक्षण आहे.जर इंधनाचा तुटवडा कमी करून दरवाढ कमी न केल्यास येणाऱ्या काळात बीड जिल्ह्य काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असे आवाहन जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी केले.यावेळी प्रवीणकुमार शेप, बाळासाहेब ठोंबरे, दादासाहेब मुंडे,गणेश राऊत,गणेश बजगुडे, महावीर मस्के,परवेज कुरेशी,मीनाक्षी ताई पांडुळे,दत्ता कांबळे, संभाजी जाधव,प्रकाश मुंडे,राहुल जाधव,प्रवीण खोडसे,सय्यद फारुख, आकाश गायकवाड, शिवाजी कोटुळे,शिवाजी देशमुख,इलियास टेलर, शेख मोहसिन,शेख अमर,गणेश कारंडे,शेख नौशाद,अशोक केदार, अशोक बहिरवाल, विशाल मस्के,हरिभाऊ सावंत,राम शेळके,शेख मुशर्रफ,अविनाश दरपे, उद्धव जोगदंड,विजय पवार,कल्याण टेकाळे, विष्णू मस्के,मनोहर गीते, शेख जाहीर,शाम मुंडे, दीपक कराड,जमील खान यांच्यासह आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## किमान पिण्याचे पाणी द्या, स्वच्छता करा; सुधीरभाऊंच्या फंडातील कामे तात्काळ सुरू करा-भाजपाचे अल्टिमेटम

दैनिक वादळ वार्ता

**मूल । प्रतिनिधी**

मूल शहरातील बिघडलेली स्वच्छता व्यवस्था, अनियमित पाणी पुरवठा तसेच आमदार सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या विविध निधीतून मंजूर करण्यात आलेली विकासकामे तात्काळ सुरू करण्यात यावीत, या मागणीसाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने मुख्याधिकारी, नगर परिषद मूल यांना निवेदन देण्यात आले.

नगर परिषद प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराबाबत यावेळी भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. शहरातील अनेक भागांमध्ये नियमित साफसफाई होत नसल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. नाल्यांमध्ये साचलेला कचरा, रस्त्यांवरील अस्वच्छता आणि सार्वजनिक ठिकाणांची दयनीय अवस्था यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरात तात्काळ विशेष स्वच्छता मोहीम राबवून स्वच्छता व्यवस्था सुरळीत करावी, अशी मागणी भाजपाच्या वतीने करण्यात आली. तसेच अनेक भागांमध्ये पाणी पुरवठा अत्यंत अनियमित होत असल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.नागरिकांना मूलभूत सुविधा पुरवण्यात नगर परिषद प्रशासन अपयशी ठरत आहे. नियमित व पुरेसा पाणीपुरवठा तातडीने सुरू करण्यात यावा, अन्यथा तीव्र लोकआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.याशिवाय आमदार सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी विविध फंडातून मंजूर करून आणलेली अनेक विकासकामे अद्याप सुरू न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी असल्याचे भाजपाने म्हटले आहे. मंजूर कामे रखडवून शहराच्या विकासाला अडथळा निर्माण करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी तसेच सर्व विकासकामे तात्काळ सुरू करून वेळेत पूर्ण करण्यात यावीत, अशी मागणी करण्यात आली.या वेळी भाजपा शहराध्यक्ष प्रविण मोहुर्ले, भाजपा नेते मोतीलाल टहलियानी, नगरसेविका अश्विनी निकोडे, नगरसेविका प्राची आक्केवार, माजी सभापती मिलिंद खोब्रागडे, राकेश ठाकरे, निलेश राय, मनिषा गानलेवार, संदीप मोहब्बे, लीना बद्देलवार, सुरज मान्दाळे, हर्ष गानलेवार, संतोष गाजुलवार, आनंद आक्केवार, रुपेश निकोडे, बिंदू जुमडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.नगर परिषद प्रशासनाने नागरिकांच्या समस्या गांभीर्याने घेऊन तातडीने कार्यवाही करावी, अन्यथा भारतीय जनता पक्षाच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल आणि त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील, असा गंभीर इशारा यावेळी देण्यात आला.




## नागभीड तालुका सोसायटीच्या मका खरेदी केंद्राचे तहसीलदारांच्या हस्ते उद्घाटन

दैनिक वादळ वार्ता

**नागभीड । प्रतिनिधी**

किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत रब्बी पणन हंगाम २०२५-२६ साठी मंजूर करण्यात आलेल्या नागभीड तालुका खरेदी-विक्री सोसायटीच्या मका खरेदी केंद्राचा शुभारंभ गुरुवारी तहसीलदार महेश देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला. सोसायटीचे अध्यक्ष संजु उरकुडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या छोटेखानी कार्यक्रमात या केंद्राचे उद्घाटन उत्साहात पार पडले.नागभीड तहसील कार्यालयाजवळील शासकीय गोदामात झालेल्या कार्यक्रमाला तालुका पुरवठा अधिकारी चांदेकर, सोसायटीचे उपाध्यक्ष रमेश पाटील बोरकर, माजी जिल्हा परिषद सदस्य तथा सोसायटी संचालक संजय गजपुरे, कृउबास तथा सोसायटी संचालक आनंद कोरे, चंद्रशेखर विगम, संचालक राहुल सवाईकर तसेच गोदाम किपर रहांगडाले यांची प्रमुख उपस्थिती होती.आमदार बंटीभांगडिया यांच्या सहकार्याने हे मका खरेदी केंद्र मंजूर करण्यात आले असून, या केंद्रामुळे नागभीड, चिमूर आणि ब्रह्मपुरी तालुक्यातील मका उत्पादक शेतकऱ्यांना प्रथमच मोठा दिलासा मिळणार आहे. सोसायटीने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत अडीचशेहून अधिक शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी केली असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# निवेदन देण्यासाठी निघालेल्या गफूर सय्यद यांचा हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू

## दहा दिवसांपूर्वीच मुलाचा मृत्यू; केज शहरावर शोककळा

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

दहा दिवसांपूर्वीच तरुण मुलाचा मृत्यू झाल्याने दुःखाच्या खोल गर्तेत असलेल्या रसूल गफूर सय्यद यांचे शुक्रवारी हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाल्याची अत्यंत दुर्दैवी घटना घडली. शिवसेनेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना आपल्या व्यथा मांडण्यासाठी निवेदन देण्यास जात असताना त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले आणि काही क्षणातच काळाने त्यांच्यावर झडप घातली. या घटनेने केज शहरासह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.शिवसेनेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचा शिव संवाद मराठवाडा दौरा सध्या सुरू असून शुक्रवारी केज येथे आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. याच बैठकीपूर्वी रसूल गफूर सय्यद हे खासदारांना निवेदन देण्यासाठी जात असताना अचानक त्यांना तीव्र हृदयविकाराचा झटका आला. उपस्थितांनी तत्काळ त्यांना केज येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांच्या प्रयत्नांनंतरही उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

विशेष म्हणजे अवघ्या दहा दिवसांपूर्वीच त्यांच्या मुलाचे निधन झाले होते. मुलाच्या मृत्यूच्या दुःखातून कुटुंब सावरत असतानाच घरातील कर्त्या व्यक्तीचेही निधन झाल्याने सय्यद कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. परिसरात सर्वत्र शोककळा पसरली असून अनेकांनी सय्यद कुटुंबीयांच्या घरी जाऊन सांत्वन केले.या घटनेची माहिती मिळताच खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी तातडीने रसूल सय्यद यांच्या निवासस्थानी भेट देत कुटुंबियांचे सांत्वन केले. यावेळी मंत्री भरतशेठ गोगावले, खासदार संदीपान भुमरे, माजी आमदार प्रा. सौ. संगीता ठोंबरे, युवासेना निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते. कुटुंबियांच्या डोळ्यातील अश्रू आणि घरातील शोकमय वातावरण पाहून उपस्थितांनाही अश्रू अनावर झाले.



### सय्यद कुटुंबाला शिवसेनेचा आधार

**रसूल गफूर सय्यद यांच्या निधनानंतर खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी कुटुंबीयांना पाच लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली. तसेच सय्यद यांच्या मुलांच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी शिवसेना घेईल, असे आश्वासन त्यांनी दिले. या कठीण प्रसंगी सय्यद कुटुंब एकटे नाही, असा दिलासादायक शब्द त्यांनी कुटुंबीयांना दिला.**

# माजलगावात राजमाता अहिल्याबाई होळकर जन्मोत्सवाचे आयोजन

## पिवळ्या ध्वजाचे ध्वजारोहण; महिलांच्या हस्ते महाआरती व अभिवादन सभा

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

सकल धनगर समाज, माजलगाव विधानसभा मतदारसंघ यांच्या वतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून हा कार्यक्रम दिनांक ३१ मे रोजी उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ वाजता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर चौक येथे पिवळ्या ध्वजाच्या ध्वजारोहणाने होणार असून हा कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होईल.

त्यानंतर सकाळी १० वाजता समाजातील महिलांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महाआरती तसेच अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात समाजातील महिला भगिनींसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून भाजपा विधानसभा प्रमुख माधव निर्मळ हे उपस्थित राहणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले हे राहणार आहेत. विशेष उपस्थिती म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश गवते, सरपंच राज अर्जुन, सरपंच नारायण भले उपस्थित राहतील.

तसेच प्रमुख अतिथी म्हणून बंडू खांडेकर, ज्ञानेश्वर सरवदे, यशवंत गायके, अण्णासाहेब वगरे, अशोकराव डोणे, बबनराव सरवदे, भगवानराव सरवदे, ॲड. विनायकराव लवटे, सुभाषराव गडदे, डॉ. भारत वाघमोडे, लक्ष्मीकांत सोन्नर, नारायण सातपुते, मुक्तीराम आबुज, संजय धरपडे, बाळासाहेब सोनसळे, ह.भ.प.शिवाजी महाराज गडदे, विशाल देवकते, संपतराव हराळ, भागवत गायकवाड ,ॲंड.जयराम सजगणे, रणजीत रुपनर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या जन्मोत्सव सोहळ्यास माजलगाव मतदार संघातील नागरिकांनी व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन संयोजक विलास नेमाने, संतोष देवकते, जयंत अध्यक्ष अशोक चोरमले, रामेश्वर शिंदे, रणजीत चोरमले, सुरेश देवकते, आप्पासाहेब तायडे, प्रथमेश बोरखडे, अशोक देवकते, अर्जुन भुतकर, हनुमान गावडे, हरिचंद्र कुंडकर, गणेश हजारे, दत्ता मुळे, दिगंबर घुमरे, अनिल आवाड, अर्जुन दिवटे, सुभाष गवळी, अशोक गवळी, हनुमान बाबरे, रामेश्वर काळे, सचिन वगरे, रामेश्वर सरवदे यांनी केले आहे.



# डॉ.प्रमिला पाटील (नकाते) यांना 'राष्ट्रीय रामानुजन फेलोशिप' जाहीर

दैनिक वादळ वार्ता
**मुखेड । प्रतिनिधी**

तालुक्यातील खतगाव (पोस्ट : ब्रेटमोगरा) येथील आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या शास्त्रज्ञ डॉ. प्रमिला पाटील (नकाते) यांना भारत सरकारची अत्यंत प्रतिष्ठेची 'राष्ट्रीय रामानुजन फेलोशिप' जाहीर झाली आहे. त्यांच्या या यशामुळे नांदेड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या (DST) अंतर्गत कार्यरत असलेल्या 'अनुसंधान नॅशनल रिसर्च फाउंडेशन' (ANRF) तर्फे ही फेलोशिप प्रदान केली जाते. परदेशातून भारतात परतणाऱ्या उच्च दर्जाच्या भारतीय संशोधकांना त्यांच्या नावीन्यपूर्ण आणि प्रभावी संशोधनासाठी ही मानाची फेलोशिप दिली जाते. या फेलोशिपअंतर्गत डॉ. प्रमिला यांना देशातील आघाडीच्या संशोधन संस्थेत पाच वर्षांसाठी स्वतंत्र वैज्ञानिक म्हणून कार्य करण्याची संधी मिळणार आहे. त्यासाठी त्यांना प्रतिमहा १.३५ लाख रुपये मानधन, वार्षिक ७ लाख रुपये संशोधन निधी तसेच ६० हजार रुपये प्रवास भत्ता मिळणार आहे. यासोबतच त्या पीएच.डी. विद्यार्थ्यांना मार्गदर्शनही करू शकणार आहेत.

डॉ. प्रमिला पाटील यांनी दोन वेगवेगळ्या विषयांत पीएच.डी. पदव्या संपादन केल्या आहेत. पहिली पीएच.डी. त्यांनी कोईम्बतूर विद्यापीठ (तमिळनाडू) आणि संरक्षण संशोधन व विकास संस्था (DRDO) यांच्या प्रयोगशाळेतून पूर्ण केली, तर दुसरी पीएच.डी. त्यांनी दक्षिण कोरियातील जॉनबुक नॅशनल युनिव्हर्सिटीमधून प्राप्त केली. त्यांचा मुख्य संशोधन विषय 'पेरोव्हस्काईट सोलर सेल्स' हा असून, या विषयावर त्यांचे अनेक संशोधन निबंध आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नामांकित जर्नल्समध्ये प्रकाशित झाले आहेत. त्यांना 'सर्वोत्कृष्ट पीएच.डी. प्रबंध' पुरस्कार तसेच भारत सरकारच्या CSIR संस्थेकडून 'रिसर्च असोसिएट फेलोशिप' देखील प्राप्त झाली आहे.पीएच.डी. नंतर त्यांनी कोरिया युनिव्हर्सिटी तसेच जर्मनीतील क्नइ बर्लिन संशोधन केंद्र येथे संशोधक म्हणून कार्य केले आहे. याशिवाय हाणयांग युनिव्हर्सिटी, घखडढ आणि इंग्लंडमधील ऑक्सफर्ड फोटोव्होल्टाइकस प्रा. लि. कंपनीमध्ये कायमस्वरूपी वैज्ञानिक म्हणून त्यांची निवड झाली होती. परदेशात उच्च वेतनाच्या संधी उपलब्ध असूनही डॉ. प्रमिला यांनी मातृभूमीची सेवा करण्याचा निर्णय घेतला. 'मेक इन इंडिया' अंतर्गत भारतातच प्रगत सोलर सेल्सची निर्मिती करून देशाला ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भर बनवण्याचा त्यांचा संकल्प आहे.



भारतात प्रत्येकाला स्वस्त आणि स्वच्छ ऊर्जा उपलब्ध व्हावी तसेच खनिज तेल आणि गॅससाठी परदेशांवरील अवलंबित्व कमी व्हावे, हे त्यांचे ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले. त्या लवकरच बंगळुरू येथील प्रतिष्ठित 'भारतीय विज्ञान संस्था' (IISc) अंतर्गत कार्यरत 'सेंटर फॉर नॅनो सायन्स अँड इंजिनिअरिंग' (CeNSE) येथे 'रामानुजन फेलो' म्हणून रुजू होणार आहेत.

डॉ. प्रमिला यांनी आपल्या या यशाचे श्रेय वडील सेवानिवृत्त सुभेदार मेजर अशोक पाटील, सासरे तुकाराम नागोराव नकाते आणि पती डॉ. उमेश तुकाराम नकाते यांना दिले आहे. त्यांच्या प्रोत्साहन आणि पाठिंब्यामुळेच हे यश मिळाल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या.यावेळी त्यांनी ग्रामीण भागातील मुलींना विशेष आवाहन करताना सांगितले की, मुलींनी विज्ञान आणि संशोधन क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर पुढे यावे. देशाच्या तंत्रज्ञान प्रगतीत महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे.

डॉ. प्रमिला पाटील यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल जिल्हाभरातून तसेच शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# घनसावंगी तालुका ग्रामपंचायत अधिकारी संघटनेच्या अध्यक्ष पदी भरत गोल्डे,सचिव पदी धर्मा लहामगे यांची बिनविरोध निवड



दैनिक वादळ वार्ता
**जालना । असलम कुरेशी**

ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष डी.बी.काळे यांच्या अध्यक्षतेखाली घनसावंगी येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी घनसावंगी तालुका ग्रामपंचायत अधिकारी संघटनेच्या अध्यक्षपदी भरत गोल्डे यांची तर सचिवपदी धर्मा लहामगे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

ही निवड प्रक्रिया पार पाडण्यासाठी संघटनेचे जिल्हा सरचिटणीस व्ही.ए. भगत, पतसंस्था संचालक व माजी सचिव बी.जी. पिंपळे, पतसंस्था सचिव जी.एस. मुपडे, जिल्हा उपाध्यक्ष एस.व्ही. काचेवाड, संचालक एस.बी. शेजुळ, के.डी.भोजने, माजी अध्यक्ष रुपनर, माजी सचिव डी.जी. मानकर, तसेच घनसावंगी तालुक्यातील इतर ग्रामपंचायतचे ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी, यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. यावेळी बिनविरोध निवड झालेल्या नवनिर्वाचित अध्यक्ष व सचिव यांचे स्वागत करण्यात आले. तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देऊन अभिनंदन करण्यात आले.

# असलम कुरेशी यांना राष्ट्रीय पत्रकार पुरस्कार जाहीर

दैनिक वादळ वार्ता
**जालना । प्रतिनिधी**



पत्रकारिता क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल दैनिक अहिल्याराजच्या इंडियन एक्सलन्स अवॉर्ड २०२६ राष्ट्रीय पत्रकार पुरस्कारासाठी घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथील पत्रकार धुरंधर मराठवाडा वत्तचे संपादक असलम कुरेशी यांची निवड करण्यात आली आहे.

पत्रकार असलम कुरेशी मागील २५ वर्षापासून पत्रकारितेच्या क्षेत्रात सक्रिय आहे. कुरेशी यांनी आतापर्यंत विविध नामांकित वृत्तपत्रात काम केलेले आहे. असलम कुरेशी यांनी विधिध मुद्द्यावर उत्कृष्ट लिखाण केले. त्यांच्या या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेऊन दैनिक अहिल्याराजच्या इंडियन एक्सलन्स अवॉर्ड २०२६ च्या राष्ट्रीय पत्रकार पुरस्कारासाठी असलम कुरेशी यांची निवड करण्यात आली असून हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल कुरेशी यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असल्याने नागरिकांनी दक्षता घेण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता
**जालना । असलम कुरेशी**

प्रादेशिक हवामान शास्त्र केंद्र, कुलाबा, मुंबई यांच्या सूचनेनुसार जालना जिल्ह्यात दि. ३१ मे ते २ जुन २०२६ या कालावधीत अलर्ट जारी केला असुन तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह, सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता वर्तविली आहे. दि. ३१ मे ते २ जुन २०२६ रोजी पर्यंत ऑरेंज अलर्ट जारी केला असुन तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह, सोसाट्याचा वारा (ताशी ४०-५० कि.मी.प्र.ता. वेगाने) हलका ते मध्यम स्वारुपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे. तसेच दि. ३१ मे ते २ जुन २०२६ रोजी पर्यंत यलो अलर्ट जारी केला असून तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील नागरिकांनी वादळी वारे, विजेपासून स्वतःसह जनावरांचे संरक्षण करण्यासाठी योग्य ती दक्षता बाळगावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, विज चमकत असताना किंवा वादळी वारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहु नये. विजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. गडगडाटीच्या वादळादरम्यान व विज चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. विजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा. ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल, सायकल यांच्यापासून दूर रहावे. मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजाचे खांब, विद्युत/दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विद्युतवाहिनी अथवा ट्रॉन्सफॉर्मरजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अधांतरी लटकणाऱ्या, लोंबणाऱ्या तारांपासून दूर रहावे. वीज चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे. जमिनीशी कमीतकमी संपर्क असावा. शेतकऱ्यांनी काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी किंवा झाकून ठेवावी. आपात्कालीन परिस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियंत्रण कक्ष तसेच नजीकच्या तहसील कार्यालयात, पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा. असेही कळविले आहे.



# बळी महादेव येथे शिवभक्तांची ऐतिहासिक उपस्थिती व्यसनमुक्ती शिक्षण आणि विज्ञाननिष्ठेचा संदेश देत अखंड शिवनाम सप्ताहाची सांगता

## राष्ट्रसंतांच्या विचारांचा विज्ञाननिष्ठ समाज घडविण्याचे-युवा संत राजशेखर शिवाचार्य महाराज यांचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता
**धर्माबाद । प्रतिनिधी**

धर्माबाद तालुक्याजवळील गोदावरी तटावरील पवित्र श्रीक्षेत्र बळी महादेव मंदिर येथे राज्यस्तरीय अखंड शिवनाम सप्ताहाचा भव्य दिव्य सोहळा हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीत अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. राष्ट्रसंत सद्गुरु डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांच्या प्रेरणेने तब्बल ४७ वर्षांपूर्वी सुरू झालेल्या या अखंड शिवनाम सप्ताहाची पुनरावृत्ती अधिक मासानिमित्त २०१७ पासून युवा संत राजशेखर शिवाचार्य महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, यंदाही २१ मे ते २८ मे दरम्यान हा आध्यात्मिक सोहळा मोठ्या भक्तिभावात पार पडला.

या सप्ताहाच्या प्रारंभी धर्माबाद येथील जगतज्योती महात्मा बसवेश्वर अनुभव मंटप, बसवन्ना हिल्स धर्माबाद येथून विळेगाव थडी येथील श्री बळी महादेव मंदिरापर्यंत भव्य शोभायात्रा काढण्यात आली होती. ढोल-ताशे, शिवनामाचा गजर, भजनी मंडळे आणि हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला होता.सप्ताहातील दैनंदिन धार्मिक कार्यक्रम, शिवनाम जप, कीर्तन, प्रवचन आणि महाप्रसादासाठी महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेश या तीन राज्यांतील असंख्य शिवभक्तांनी मोठी गर्दी केली होती. महाराष्ट्रातील अनेक शिवाचार्य, कीर्तनकार, गायक आणि वादक यांची उपस्थिती या सप्ताहाचे विशेष आकर्षण ठरली.

सप्ताहाच्या सांगता प्रसंगी युवा संत राजशेखर शिवाचार्य महाराज यांनी जवळपास तीन तास प्रभावी शिवकीर्तनातून युवकांना मार्गदर्शन केले. राष्ट्रसंतांनी सुरू केलेले मानवकल्याणाचे अधुरे कार्य पूर्ण करण्यासाठी युवकांनी संघटित होणे काळाची गरज आहे. अंधश्रद्धा, व्यसनाधीनता आणि सामाजिक वाईट प्रथांपासून दूर राहून विज्ञानवादी दृष्टिकोन स्वीकारावा, असे आवाहन त्यांनी केले.यावेळी बोलताना त्यांनी युवकांवर राष्ट्रनिर्मितीची मोठी जबाबदारी असल्याचे सांगितले. शिक्षणाचे महत्त्व, बालविवाह निर्मूलन, निर्व्यसनी जीवन, सामाजिक समता आणि व्यवहारातील नैतिकता या विषयांवर त्यांनी आपल्या कीर्तनातून प्रभावीपणे भाष्य केले. राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य महाराजांनी १०४ वर्षे मानवकल्याणासाठी आयुष्य अर्पण केले असून, त्यांचा विचार आणि कार्य पुढे नेण्याची जबाबदारी समाजातील प्रत्येक घटकाने स्वीकारावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.या भव्य सोहळ्यासाठी सुमारे २५ एकर परिसरात विशाल अनुभव मंडप उभारण्यात आला होता. महिला आणि पुरुषांसाठी स्वतंत्र महाप्रसाद व्यवस्था करण्यात आली होती. सप्ताहादरम्यान दोन दिवस वादळी वाऱ्यासह पावसाचे वातावरण निर्माण झाले होते; मात्र शिवभक्तांच्या श्रद्धा आणि नियोजनामुळे कार्यक्रमात कोणताही अडथळा निर्माण झाला नाही.पंचक्रोशीतील हजारो शिवभक्तांनी तन, मन आणि धनाने या अखंड शिवनाम सप्ताहासाठी परिश्रम घेतले. सप्ताह समितीच्या वतीने सर्व ग्रामस्थ, शिवभक्त आणि उपस्थितांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077